ढाणकीत होणारे सिमेंट रस्ते अत्यंत निकृष्ट, बांधकाम विभागाचे किती टक्के सहभाग? चर्चेला उधाण ? >>पान 2

शाहू महाराज यांच्यासोबत विकासाच्या मुद्यावर चर्चा >>पान 3

स्थानिक स्वराज्य संस्थेवर भगवा फडकविण्यासाठी शिवसेना सदस्य नोंदणी मोठ्या प्रमाणात करा >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 01 ■ रविवार, दि. 20 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

यशस्वी होण्यासाठी स्पष्ट ध्येय ठेवा.



अभिनेत्री संगीता बिजलानी यांच्या लोणावळ्यातील फार्म हाऊसमध्ये चोरी; अनेक वस्तू गेल्या चोरीला आतील पान

# विनाअनुदानित शाळांना दिलासा

## १ ऑगस्टपासून शिक्षकांच्या खात्यात जमा होणार अनुदान; मंत्री पंकज भोयर यांची घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : मुंबईच्या आझाद मैदानात मागील आठवड्यात विनाअनुदानित शिक्षकांचं विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरू होतं. या आंदोलकांना अखेर यश आलं आहे. येत्या १ ऑगस्टपासून शिक्षकांच्या खात्यात अनुदान जमा होणार असल्याची घोषणा राज्य मंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत केली आहे. खासगी विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळा आणि कार्यरत शिक्षक तसंच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना येत्या १ ऑगस्टपासून वेतन अनुदानाचा पुढील टप्पा देण्यासाठी आवश्यक निधीस मंत्रिमंडळात मंजुरी देण्यात आली आहे. या वेतनासाठी दरवर्षी ९७० कोटी ४२ लाख रुपये एवढा खर्च होणार आहे.**

राज्य सरकारनं ऑक्टोबर २०२४ मध्ये शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला होता. या निर्णयानुसार सुरुवातीला २० टक्के अनुदान देण्यात येणार होतं. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी झाली नव्हती. शाळांना प्रत्यक्ष निधी वितरित करण्यात आलेला नव्हता. या निर्णयानंतर दोन अधिवेशनं पार पडली, तसंच तिसरं अधिवेशन सुरू असतानाही सरकारकडून टप्पा अनुदानासाठी आवश्यक असलेली पुरवणी मागणी सादर करण्यात आलेली नव्हती. परिणामी, शिक्षक समन्वय संघानं तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा पवित्रा घेतला. या पार्श्वभूमीवर शिक्षक समन्वय संघाकडून मुंबईतील आझाद



मैदानावर धरणे आंदोलन सुरू करण्यात आलं होतं.

बीड मधील खाजगी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना चारित्र्य प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आलंय. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी याबाबतचे निर्देश दिले आहेत. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग गुणवत्ता विकास आढावा बैठकीत याबाबतचे निर्देश दिले गेलेत.

स्वयं अर्थसहाय्यित शाळातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे चारित्र्य संबंधित पोलीस विभागामार्फत करून घ्यावे, विस्तार अधिकारी गटशिक्षणाधिकाऱ्यांनी भेटी दिल्यास शाळा व्यवस्थापनाने ते सादर करावे.. तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गुणवत्ता वाढीसाठी विशेष अंमलबजावणी करावी अशा सूचनाही यावेळी करण्यात आल्या.

वर्धा जिल्ह्याच्या पुलगाव नगर परिषदेत स्वच्छता विभागात सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याला चक्क प्राथमिक शाळेत शिकविण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून सर्वत्र आश्र्चर्य व्यक्त होत आहे. शिक्षण राज्य मंत्री म्हणून स्वतः पालकमंत्री असणाऱ्या जिल्ह्यात ही धक्कादायक बाब एका पत्रामुळे समोर आली आहे. पुलगाव येथील नगर परिषद अंतर्गत येत असलेल्या शहीद भगतसिंग प्राथमिक शाळा क्रमांक ४ येथे स्वच्छता विभागात सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या चेतन रमेश चंडाले याला अतिरिक्त जबाबदारी देत शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी देण्यात आली. तसे पत्रच मुख्याधिकाऱ्यांनी काढले आहे. सदर पत्रावर मुख्याधिकाऱ्यांची स्वाक्षरी देखील आहे.

## छत्रपती संभाजीनगरमधील भोंदू बाबाचा पर्दाफाश



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** प्रसिद्ध बिरोबा मंदिरात दरबार भरून दारू सोडवण्यासाठी मूत्र द्यायला सांगितले अन् भूत उतरवण्यासाठी चक्क बूट तोंडात धरायला लावणाऱ्या भोंदू बाबाचा अंधश्रद्धा निर्मूलन समितीने पर्दाफाश केला आहे. ही घटना जिल्ह्यातील वैजापूरच्या शिरूर येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी शिऊर बंगला पोलिस ठाण्यामध्ये भोंदू बाबा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय रंगनाथ पवार वय ५० असं भोंदू बाबाचं नाव आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

## ऋतुराज गायकवाडने अचानक निर्णय बदलला, इंग्लंडमधून माघारी, भारतीय सलामीवीराचं पदार्पण लांबणीवर

**मुंबई/प्रतिनिधी :** इंग्लंडमधून एक धक्कादायक बातमी आली आहे. भारतीय क्रिकेट संघाचा युवा सलामीवीर ऋतुराज गायकवाडने अचानक भारतात परतण्याचा निर्णय घेतला आहे. तो आता यॉर्कशायरकडून काउंटी क्रिकेटमध्ये खेळणार नाही. काउंटी क्लबने एक निवेदन जारी करून ही माहिती दिली आहे.

ऋतुराज गायकवाडने यॉर्कशायरकडून काउंटी चॅम्पियनशिप आणि एकदिवसीय कप खेळण्याचा करार केला होता, परंतु आता वैयक्तिक कारणांमुळे तो काउंटी क्रिकेटमध्ये पदार्पण करू शकणार नाही. त्याने स्पर्धेतून आपले नाव मागे घेतल्याचे समोर आले आहे. ऋतुराज गायकवाड इंग्लंड लायन्सविरुद्ध दोन अनधिकृत कसोटी सामन्यांसाठी इंडिया-अ संघासोबत इंग्लंड दौऱ्यावर गेला होता. परंतु, त्याला एकाही सामन्यात खेळण्याची संधी मिळाली नाही. त्यानंतर ऋतुराज गायकवाडने तिथे यॉर्कशायरशी करार केला. त्याला काउंटी चॅम्पियनशिप आणि वन डे कप दोन्ही स्पर्धांमध्ये खेळावे लागले. गायकवाड आणि यॉर्कशायर यांच्यात पाच सामन्यांचा करार होता. ऋतुराज गायकवाड दि. २२ जुलैपासून काउंटी क्रिकेट खेळणार होता. तथापि, त्याने आता अचानक भारतात परतण्याचा निर्णय घेतला आहे.

## एकीसोबत डिवोर्स, दुसरीही वर्षभरात गेली पळून! हार्दीक पांड्याचा रुमर्ड गर्लफ्रेंडसोबत ब्रेकअप?

**मुंबई/प्रतिनिधी :** क्रिकेटर हार्दीक पांड्याचा वर्षभरापूर्वी डिवोर्स झाला. नताशा स्टॅनकोविकला डिवोर्स दिल्यानंतर हार्दिक पंड्याचं नाव जास्मिन वालियाशी जोडले गेलं होतं. चॅम्पियन्स ट्रॉफी दरम्यान जास्मिन वालिया स्टेडियममध्ये सामना पाहताना दिसली होती. त्यानंतर मॉडेलचे नाव सतत भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पंड्याशी जोडले जात होते. जस्मिन अनेकदा हार्दिकच्या टीम मॅचेसमध्ये दिसली होती. त्याचबरोबर ती मुंबई इंडियन्स टीम बसमध्येही दिसली होती. या जोडप्याला अनेक महिने डेट केल्याची चर्चा होती.

दरम्यान जास्मिन आणि हार्दीक पांड्याचा ब्रेकअप झाल्याची माहिती समोर आली आहे.

## सातारा, कोल्हापूरसह दक्षिण मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्याच्या पावसाचा अंदाज

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात पावसाचा जोर कमी झालेला असताना गेल्या दोन दिवसांपासून कोकण किनारपट्टीसह दक्षिण व मध्य महाराष्ट्रात पावसाला पोषक हवामान तयार झाले आहे. शुक्रवारी तळ कोकणासह बहुतांश महाराष्ट्रात पावसाचे हाय अलर्ट देण्यात आले होते. दरम्यान, हवामान विभागाने पुढील चार दिवस पावसाचा जोर हळूहळू ओसरणार असल्याचं सांगितलं. तळ कोकणासह दक्षिण मध्य महाराष्ट्रात पावसाचे यलो अलर्ट देण्यात आले आहेत. मराठवाड्यात धाराशिव, लातूर तसेच विदर्भात अकोला अमरावतीतही जोरदार पावसाची शक्यता आहे .हवामान विभागाच्या ताज्या उपग्रह निरीक्षणानुसार, सध्या कर्नाटक आणि केरळच्या किनारपट्टीवर तसेच उत्तर गुजरात राजस्थान व महाराष्ट्राच्या काही भागात वादळी वाऱ्यांची शक्यता आहे .घाटमाथ्यांवर व पूर्व विदर्भाच्या बाजूला सध्या पावसाचे काळे ढग दिसत आहेत.

## कल्याणमध्ये २२ लाख रुपयांच्या ड्रग्जसह दोघांना अटक

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याणमध्ये एमडी ड्रग्ज सापडल्याची घटना सुरुचं आहे. आत्ता कल्याणच्या डीसीपी स्कॉर्डने २२ लाखाचे एमडी ड्रग्ज जप्त करीत या प्रकरणात मोहम्मद कैफ शेख आणि फरदीन शेख या दोन तरुणांना अटक केली आहे. यांनी हे ड्रग्ज कोणाकडून आणले होते? यांचे ग्राहक कोण आहेत? याचा तपास बाजारपेठ पोलिस आणि डीसीपी स्कॉर्डने संयुक्तरित्या करणार आहेत.




कल्याण-डोंबिवली डीसीपी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याणच्या डीपीसी स्कॉर्डने आणि पोलिस ठाण्याची टीम यांनी एक अंमली पदार्थ विरोधात मोठी मोहिम सुरु केली आहे. काही दिवसांपूर्वी डोंबिवलीत हायप्रोफाईल सोसायटीत दोन वेगवेगळ्या घटनेत जवळपास चार कोटी २४ लाखाचे एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले. या प्रकरणात एका परदेशी नागरिकासह पाच जणांना अटक केली होती. अशाच प्रकारे कल्याण-डोंबिवली गेल्या सात महिन्यापासून डीसीपी अतुल झेडे यांच्या नेतृत्वात मोठी कारवाई करण्यात आली आहे. अनेक जणांना अटक करण्यात आलेली आहे. तर दुसरीकडे कल्याण पश्चिमेतील खडकपाडा पोलीस ठाण्याच्या योगीधाम अमृतधाम सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर रवी गवळी नावाच्या एका ३० वर्षीय तरुणाकडे २५ हजार रुपये किंमतीचा गांजा पोलिसांनी हस्तगत केला आहे. रवी गवळी याने हा गांजा कोणाला विकण्याकरीता आणला होता. याचा तपास खडकपाडा पोलिस करीत आहेत.

## वैष्णवी हगवणे प्रकरणात धक्कादायक अहवाल, जालिंदर सुपेकर यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता!

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला हादरवणाऱ्या वैष्णवी हगवणे प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. पुण्यालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला हादरवणाऱ्या वैष्णवी हगवणे प्रकरणात महिला आयोगाने आपला अहवाल सादर केलाय. यामध्ये पुण्यातील तत्कालीन पोलिस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांच्यावर देखील कारवाईची मागणी केली गेली आहे. त्यामुळे आता जालिंदर सुपेकर यांच्या अडचणी वाढणार की काय? असा सवाल विचारला जात आहे.

पोलिसांच्या तपासात अनेक त्रुटी

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात महिला आणि बालकल्याण समितीचा अहवाल समोर आला आहे. हुंड्यासाठीच वैष्णवी हगवण्याचा बळी गेल्याचं या अहवालात म्हटलं आहे. तत्कालीन पोलीस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांच्या चौकशीचे आदेश देण्यात यावेत, अशी देखील शिफारस समितीने केली आहे. पोलिसांच्या तपासात अनेक त्रुटी असल्याचं देखील म्हटलं गेलं आहे.

मयुरी हगवणे प्रकरणाची जर दखल घेतली असती तर वैष्णवीची आत्महत्या टाळता आली असती, असं देखील अहवालात म्हटलं आहे. त्याचबरोबर, मयुरी हगवणेची तक्रार न घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस देखील समितीने केली आहे.

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने पुणे येथील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाच्या अनुषंगाने राज्यात महिलांवरील अत्याचार तसेच हुंडाबळी प्रकरणाबाबतचा पहिला



अहवाल विधानसभेत शुक्रवारी सादर केला. आमदार मोनिका राजळे यांच्या अध्यक्षतेखाली या समितीने न्याय मिळावा, अशी मागणी लावून धरली आहे.

दरम्यान, चौकशी करताना समितीला काही महत्त्वाची माहिती मिळाली. हुंड्याच्या माध्यमातून ब्रँडेड गाडी, चांदीची भांडी, सोने, रोख रक्कम अशा विविध वस्तू आणि पैसे घेतल्याचे पुरावे देखील समितीला मिळाले आहे. त्यामुळे आता राजेंद्र हगवणे आणि संपूर्ण हगवणे कुटूंबियांच्या अडचणी वाढल्या आहेत.

## रायगडच्या पायरीमार्गावरील बंदी शिथिल

**महाड/प्रतिनिधी :** किल्ले रायगडचा पायरी मार्गाचा वापर १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांनी काढले होते. मात्र आता या आदेशात शिथिलता दिली गेली आहे. त्यामुळे किल्ले रायगडचा पायरी मार्ग सुरू झाला असून केवळ अतिवृष्टी व रेड किंवा ऑरेंज अॅलर्टच्या काळात हा पायरी मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. आगामी पावसाळ्यामध्ये दगडी वारंवार पडण्याच्या घटना होण्याची शक्यता नाकारता येत नसून दगडी पडून कोणत्याही प्रकारची जीवित हानी होऊ नये, याकरिता पायरी मार्ग बंद करण्यात आला होता. किल्ले रायगडवर येणाऱ्या पर्यटक आणि शिवभक्तांच्या जीवावर या परिसरातील छोटे मोठे व्यवसाय अवलंबून असून पावसाळ्यातील दोन तीन महिने जर पायरी मार्ग बंद असेल, तर पर्यटकांची संख्या कमी होत असल्याने येथील व्यवसायिकांच्या धंद्यावर परिणाम होऊन त्यांची उपासमार होत असते.

## विमानांमध्ये बिघाडाची मालिका सुरुच, फुकेतला जाणाऱ्या एअर इंडिया विमानाचे हैदराबादमध्ये लँडिंग

दैनिक आपला विदर्भ

**हैदराबाद/वृत्तसंस्था :** फुकेतला जाणारे एअर इंडियाचे विमान शनिवारी सकाळी टेकऑफनंतर लगेचच हैदराबादमधील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर परतले. फ्लाईट रडार २४ कडून मिळालेल्या माहितीनुसार, बोईंग ७३७ मॅक्स ८ विमानावर चालणारे फ्लाइट घ्रे११०, हैदराबादहून सकाळी ६ वाजून ४० मिनिटांनी उड्डाण केले. या विमानाने २० मिनिटे उशीरा उड्डाण केले होते. हे विमान फुकेतमध्ये सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी उतरणे अपेक्षित होते.

विमान का वळवले गेले याचे कारण मात्र अद्याप स्पष्टपणे उघड झालेले नाही. एअरलाइन आणि विमानतळ अधिकाऱ्यांनी अद्याप कोणतेही निवेदन जारी केलेले नाही.

गुरूवारी सकाळी दिल्लीहून इंफाळला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे उड्डाणानंतर लगेचच परतावे लागले. प्रवास पुन्हा सुरू करण्यापूर्वी विमानाची अनिवार्य तपासणी करण्यात आली आणि अखेर नियोजित वेळेच्या सुमारे साडेचार तासांनंतर इंफाळमध्ये उतरले.

फ्लाइट ६ए-५११८ने सकाळी १० वाजून २५ मिनिटांनी आयजीआय विमानतळावरून उड्डाण केले होते. मात्र ते परत फिरले आणि सकाळी ११ वाजून १६ मिनिटांनी दिल्लीत सुरक्षितपणे उतरवले. तांत्रिक तपासणीनंतर ते दुपारी १२ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास पुन्हा उड्डाण केले आणि दुपारी



२ वाजून ५३ मिनिटांनी इंफाळमध्ये उतरले.

इंडिगोच्या प्रवक्त्याने सांगितले की, १७ जुलै रोजी दिल्लीहून इंफाळला जाणाऱ्या फ्लाइट ६ए-५११८ मध्ये टेकऑफ झाल्यानंतर लगेचच एक किरकोळ तांत्रिक बिघाड आढळला. खबरदारी म्हणून वैमानिकांनी परतण्याचा निर्णय घेतला आणि इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षितपणे उतरले.''

विमान कंपन्यांमध्ये तांत्रिक अडचणींची मालिका सुरूच आहे. दिल्लीहून गोव्याला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात ६ए-६२७१ हवेतच इंजिनमध्ये बिघाड झाला आणि ते मुंबईला वळवण्यात आले. १९ जून रोजी लेहला जाणारे इंडिगोचो विमान तांत्रिक अडचणींमुळे जवळपास दोन तास हवेत राहिल्यानंतर दिल्लीला परत न्यावे लागले.

याआधी ६ मे रोजी बँकॉकहून मॉस्कोला जाणाऱ्या एरोफ्लॉट विमानाचे केबिनमध्ये अचानक धूर आल्यानंतर दिल्ली विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.

एप्रिलमध्ये जेद्दाह-दिल्ली विमानाचे टायर फुटल्याच्या संशयामुळे आयजीआय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.

## ट्रम्प यांचा कारभार, जनता वैतागली...


अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम सहा महिने झाले. या सहा महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने सहा महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. नुकतेच स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली. आंदोलकांनी या आंदोलनाला गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले. शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य केंद्र होते. या आंदोलनात लाखो नागरिक रस्त्यावर जमले. सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला. हे आंदोलन शांततेत पार पडले तरी या आंदोलनात आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला. पब्लिक सिटिझन ग्रुपच्या सह – अध्यक्षा लिसा गिल्बर्ट यांनी सांगितले की आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे. या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध हे आंदोलन आहे. अर्थात ट्रम्प यांच्या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध अमेरिकन नागरिकांनी केलेले हे पहिलेच आंदोलन नाही. मागील महिन्यातच अमेरिकन नागरिकांनी असेच एक मोठे आंदोलन केले होते. आंदोलकांनी त्या आंदोलनाला हॅण्डस ऑफ आंदोलन असे नाव दिले होते. ते आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले गेले. त्या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला होता त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील ते आंदोलनही शांततेत पार पडल्याने कोणालाही अटक करण्यात आली नव्हती मात्र त्या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली होती. आताही तेच झाले. सह महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

# ढाणकीत होणारे सिमेंट रस्ते अत्यंत निकृष्ट, बांधकाम विभागाचे किती टक्के सहभाग? चर्चेला उधाण ?

**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड/प्रतिनिधी :** ढाणकी शहर हे लोकसंख्येच्या बाबतीत तालुका स्तरावरील शहर असून, येथील रस्ते पाहता खेड्यातील गलोगली सारखे थातूर मातुर बनवून, शासनाचे पैसे हडप करण्याचे धंदे संबंधित कंत्राटदारांनी सुरू केले आहे का ?ढाणकीतील सुजाण नागरिकांनी तक्रार केल्यानंतरही , रोड बनवणारे ठेकेदार नागरिकांना मुर्खात काढत रोड चे काम थातूर मातुर करत असल्याची शंका नागरीक उपस्थित करत आहेत. बांधकाम विभागवाले ठेकेदार यांच्याकडून आर्थिक संबंध तर जोपासत नसतील ना? ढाणकीत होणाऱ्या सर्व सिमेंट रोड मध्ये ठेकेदार भ्रष्टाचार करून बोगस रोड करून, ''सगळा माल डब्ब्यात ''च्या भूमिकेत दिसत आहे. उमरखेड बांधकाम विभाग अधिकारी यावर कुठलीच कार्यवाही करतांना दिसत नाही? उलट त्यांच्या पाठीशी उभे राहतांना दिसत असल्याची चर्चा नागरिक करीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पुसद अर्बन बँक पर्यंत चा होणारा सिमेंट रस्ता हा अत्यंत बोगस होत असल्याची तक्रार मनसे पदाधिकारी यांनी दिली, यावर सुद्धा काहीही कार्यवाही झालेली दिसत नाही.

प्रभाग क्रमांक ५ व १३ च्या बॉर्डरवर, महाकाली मंदिर ते हैदर अली चौकापर्यंत होणारा रस्ता हा अत्यंत निकृष्ट दर्जाचा होत आहे व सदर रस्ता हा इस्टिमेटनुसार न करता, महाकाली मंदिर ते हैदर अली चौका ऐवजी, महाकाली मंदिर ते मुखीरवाड यांच्या घरापर्यंतच बनवत असल्याची स्थानिक नागरिकांची ओरड आहे. यात संबंधित अधिकारी व ठेकेदाराचे आर्थिक लागेबांधे असल्याचे सुद्धा बोलल्या जात आहे.
याबद्दल शिवसेना (शिंदे) ढाणकी शहर आक्रमक मोडवर आलेली असून, रस्त्याचे काम दर्जेदार इस्टिमेट नुसार न झाल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल.
**–संजय सलेवाड, शिवसेना शहर प्रमुख ढाणकी.**



# किडनी फेल झाली अनब ट्रान्सप्लांटसाठी मदतीचं आवाहन, ५० लाख जमवले पण व्हायचं तेच झालं, कॉमेडियनच्या जाण्याने सिनेसृष्टीत हळहळ

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** तेलुगू सिनेमातील दिग्गज अभिनेते आणि विनोदी कलाकार फिश वेंकट यांचे शुक्रवारी (दि.१८) निधन झाले. पडद्यामागे त्यांना वेंकट राज या नावाने ओळखले जात होते. ते ५३ वर्षांचे होते. हैदराबादमधील एका रुग्णालयात मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे त्यांचे निधन झाले. ते गेल्या अनेक महिन्यांपासून किडनीच्या आजाराने त्रस्त होते. अलीकडे त्यांची प्रकृती खालावली होती, त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टर त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करत होते, पण ते यशस्वी होऊ शकले नाहीत. या बातमीनंतर संपूर्ण तेलुगू चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे.

काही काळापूर्वी त्यांच्या प्रकृतीत बिघाड झाल्यानंतर डॉक्टरांनी तातडीने किडनी ट्रान्सप्लांट करण्याचा सल्ला दिला होता. मात्र, कुटुंबीयांना या वैद्यकीय उपचाराचा खर्च पेलवणार नव्हता. सतत डायलिसिस आणि व्हेंटिलेटरवर ठेवूनही वेंकट यांची तब्येत अधिकच बिघडत गेली आणि अखेर त्यांना मृत्यूला शरण जावं लागलं.



ट्रान्सप्लांटचा खर्च होता ५० लाख रुपये

या महिन्याच्या सुरुवातीला, जेव्हा त्यांची प्रकृती अधिकच खालावली आणि त्यांना आयसीयूमध्ये व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. तेव्हा त्यांच्या कुटुंबियांनी आर्थिक मदतीसाठी समाजातून आवाहन केलं. फिश वेंकट यांच्या मुलीने सांगितले होते, ''पप्पांची तब्येत खूपच नाजूक आहे. त्यांना आयसीयूमध्ये ठेवले आहे. त्यांना किडनी ट्रान्सप्लांटची गरज आहे, ज्यासाठी ५० लाख रुपये खर्च येणार आहे.''

प्रभासच्या मदतीबाबत आले दोन परस्परविरोधी वक्तव्य

फिश वेंकट यांच्या मुलीने वन इंडिया या माध्यमाला सांगितले की, अभिनेता प्रभासच्या टीममधून कुणीतरी त्यांच्याशी संपर्क केला आणि किडनी ट्रान्सप्लांटच्या खर्चाची जबाबदारी घेण्याची तयारी दर्शवली. ती म्हणाली, ''पप्पांना तात्काळ ट्रान्सप्लांटची गरज होती, त्याचवेळी प्रभासचे असिस्टंट आमच्याशी संपर्कात आले आणि आर्थिक मदतीचे आश्वासन दिले.'' मात्र, नंतर सुमन टीव्हीशी बोलताना वेंकट यांच्या एका नातेवाइकाने हे स्पष्टीकरण दिले की, त्या कॉलचा कोणताही आधार नव्हता आणि तो बनावट होता. ''प्रभासला याबद्दल काहीही माहिती नाही. आम्हाला अद्याप कोणतीही आर्थिक मदत मिळालेली नाही,'' असं त्या नातेवाइकाने स्पष्ट केलं.

खलनायक ते विनोदी कलाकार – फिश वेंकट यांचा प्रवास

१९७१ साली आंध्र प्रदेशच्या म छलीपट्टणम येथे जन्मलेले फिश वेंकट यांनी २००० साली आलेल्या 'सम्मक्का सारक्का' या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी अनेक निगेटिव्ह भूमिका केल्या, पण नंतर ते एक यशस्वी कॉमेडियन म्हणून नावारूपाला आले. त्यांचा शेवटचा चित्रपट २०२५ मध्ये प्रदर्शित झालेला 'कॉफी विथ अ किलर' हा विनोदी चित्रपट होता, ज्याचे दिग्दर्शन आर. पी. पट्नायक यांनी केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि तीन मुलं असा परिवार आहे.

## अभिनेत्री संगीता बिजलानी यांच्या लोणावळ्यातील फार्म हाऊसमध्ये चोरी; अनेक वस्तू गेल्या चोरीला

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** : जिल्ह्यातील लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या अभिनेत्री संगीता बिजलानी यांच्या फार्महाऊसवर चोरी झाल्याची घटना घडली आहे. अज्ञात चोरांनी फार्म हाऊसवर तोडफोड करत ५० हजार रुपये रोख आणि ७ हजार रुपये किंमतीचा टीव्ही असं एकूण ५७ हजार रुपयांची चोरी केली आहे. या प्रकरणी मोहम्मद मुजीब खान यांच्या फिर्यादीवरून गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये मोहमद मुजीब खान (वय ५४, रा. घर नं. १/६/२६, अदिल पॅलेस, जयसिंगपुरा, छत्रपती संभाजीनगर) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही चोरी ७ मार्च ते १८ जुलै दरम्यान झाली आहे. फिर्यादी मोहमद मुजीब खान हे मोहम्मद अजहरुद्दीन यांचे स्वीय सहाय्यक आहेत. मोहम्मद अजहरुद्दीन यांची पूर्वाश्रमीची पत्नी अभिनेत्री संगीता बिजलानी यांच्या फार्म हाऊसमध्ये अज्ञात चोरानं चोरी केली. फार्म हाऊसमध्ये घुसल्यानंतर चोरानं परिसरातील कॅमेरे तोडत फार्म हाऊसची तोडफोड केली. यासह अनेक मौल्यवान वस्तू लंपास केल्या. चोरी झाली त्यावेळी फार्म हाऊसमध्ये कोणीही नव्हतं.

काही दिवसांपूर्वी संगीता बिजलानी आपल्या दोन घरगुती कर्मचाऱ्यांसह फार्म हाऊसवर गेल्या होत्या. त्यावेळी फार्म हाऊसमध्ये चोरी झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं. यावेळी फार्म हाऊसचा मुख्य दरवाजा तोडण्यात आला होता. तसंच संपूर्ण फार्म हाऊसमधील वस्तूंची तोडफोड करण्यात आली होती. फार्म हाऊसमधील खिडक्यांचं ग्रिल तुटलेल्या अवस्थेत आढळलं. एक टीव्ही गायब होता तर एकाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होतं. वरच्या मजल्यावर मोठ्या प्रमाणात धूळ पसरली होती. सर्व बेड आणि घरातील वस्तू तुटल्या होत्या. रेफ्रिजरेटर देखील तुटलेल्या अवस्थेत आढळला. फार्म हाऊसमधील अनेक मौल्यवान वस्तू गायब होत्या. आत जाण्यापूर्वी, परिसरात बसवलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तुटलेल्या अवस्थेत होते.

# लैंगिक छळाला कंटाळून बालासोरनंतर आणखी एका विद्यार्थिनीची आत्महत्या; दोन प्राध्यापकांना अटक

**बालासोर/वृत्तसंस्था :** गेल्या काही दिवसांपूर्वी लैंगिक छळामुळे त्रासून ओडिशातील बालासोरमधील एका म हाविद्यालयीन विद्यार्थिनीने स्वत:ला पेटवून घेत आत्महत्या केली. आता पुन्हा ग्रेटर नोएडामध्ये अशीच एक घटना घडली आहे. ग्रेटर नोएडामधील शारदा विद्यापीठातील बीडीएसच्या दुर्सया वर्षाला असर्णाया एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली आहे. प्राध्यापकांकडून होणाऱ्या छळामुळे तिने हे पाउल उचलल्याचे सांगितले जात आहे.

ग्रेटर नोएडामधील शारदा विद्यापीठातील एका विद्यार्थिनीने प्राध्यापकांकडून होणाऱ्या छळाला कंटाळून आत्महत्या केली. नॉलेज पार्क पोलिस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये ही घटना घडली. घटनास्थळावरून पोलिसांना एक सुसाईड नोट सापडली आहे, या सुसाईड नोटमध्ये पीडितेने तिच्या शिक्षकांवर छळाचा आरोप केला आहे. सुसाईड नोटमध्ये विद्यार्थिनीने लिहिले, ''जर मी मेले तर पीसीपी आणि डेंटल मटेरियलचे शिक्षक जबाबदार असतील. त्यांना तुरुंगात टाकले जावे, असे मला वाटते. त्यांनी मला मानसिक त्रास दिला. त्यांनी माझा अपमान केला. मी त्यांच्यामुळे बऱ्याच काळापासून तणावात आहे. त्यांनीही असेच सहन करावे असे मला वाटते,'' असे पिडीत विद्यार्थिनीने सुसाईड नोटमध्ये लिहिले.

तिने या सुसाईड नोटमध्ये दोन शिक्षकांची नावे नमूद केली आहेत. या घटनेनंतर, विद्यार्थ्यांनी महाविद्यालय प्रशासनाच्या विरोधात निदर्शने केली आणि त्यांनी या घटनेची जबाबदारी स्वीकारावी अशी म गणी केली, त्यामुळे कॉलेज कॅम्पसमध्ये तणाव वाढला. पोलीस कर्मचारी आणि निदर्शक विद्यार्थ्यांमध्ये वादही झाला. पिडीत विद्यार्थिनीच्या कुटुंबाने दाखल केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन शिक्षकांना ताब्यात घेतले आहे. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे, असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पश्चिम रेल्वेतर्फे पाच गणपती विशेष गाड्या धावणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** यंदाच्या गणेशोत्सवादरम्यान प्रवाशांच्या सोयीसाठी पश्चिम रेल्वे मुंबई सेंट्रल-ठोकूर, मुंबई सेंट्रल-सावंतवाडी रोड, वांद्रे टर्मिनस-रत्नागिरी, वडोदरा-रत्नागिरी आणि विश्वामित्री-रत्नागिरी स्थानकांदरम्यान विशेष गाड्या चालवणार आहे.

०९०११ मुंबई सेंट्रल – ठोकूर स्पेशल मंगळवारी मुंबई सेंट्रलहून सकाळी ११:३० वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ८:५० वाजता ठोकूरला पोहोचेल. ही ट्रेन २६ ऑगस्ट आणि २ सप्टेंबर रोजी धावेल.

त्याचप्रमाणे ०९०१२ ठोकूर – मुंबई सेंट्रल ही विशेष गाडी बुधवारी ठोकूर येथून सकाळी ११ वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ७:१५ वाजता मुंबई सेंट्रलला पोहोचेल. ही ट्रेन दि. २७ ऑगस्ट आणि ३ सप्टेंबर रोजी धावेल.

ट्रेन क्रमांक ०९०१९ मुंबई सेंट्रल – सावंतवाडी रोड विशेष आठवड्यातून रविवार, बुधवार, शुक्रवार आणि शनिवारी धावेल. ही ट्रेन मुंबई सेंट्रलहून सकाळी ११:३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे २:३० वाजता सावंतवाडी रोडला पोहोचेल. ही ट्रेन २२ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर पर्यंत धावेल. त्याचप्रमाणे, ट्रेन क्र. ०९०२० सावंतवाडी रोड – मुंबई सेंट्रल विशेष गाडी आठवड्यातून ४ दिवस म्हणजे रविवार, सोमवार, गुरुवार आणि शनिवार धावेल. ही ट्रेन सावंतवाडीहून पहाटे ४:५० वाजता निघेल आणि त्याच दिवशी रात्री ८ :१० वाजता मुंबई सेंट्रलला पोहोचेल. ही ट्रेन २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर पर्यंत धावेल.

ट्रेन क्रमांक ०९०१५ वांद्रे टर्मिनस – रत्नागिरी स्पेशल ही गाडी गुरुवारी दुपारी २:२० वाजता वांद्रे टर्मिनस येथून निघेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री १२ :३० वाजता रत्नागिरीला पोहोचेल. ही ट्रेन २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंत धावेल. त्याचप्रमाणे, ट्रेन क्र. ०९०१६ रत्नागिरी – वांद्रे टर्मिनस स्पेशल शुक्रवारी रत्नागिरीहून रात्री १:३० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १२ :३० वाजता वांद्रे टर्मिनसला पोहोचेल. ही ट्रेन २२ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर पर्यंत धावेल.

ट्रेन क्रमांक ०९११४ वडोदरा – रत्नागिरी स्पेशल मंगळवारी वडोदरा येथून सकाळी ११:१५ वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री १२ :३० वाजता रत्नागिरीला पोहोचेल. ही ट्रेन २६ ऑगस्ट आणि २ सप्टेंबर रोजी धावेल. त्याचप्रमाणे, ट्रेन क्र. ०९११३ रत्नागिरी-वडोदरा स्पेशल बुधवारी रत्नागिरीहून पहाटे १:३० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५ :३० वाजता वडोदरा येथे पोहोचेल. ही ट्रेन २७ ऑगस्ट आणि ३ सप्टेंबर रोजी धावेल.



ट्रेन क्रमांक ०९११० विश्वामित्री – रत्नागिरी स्पेशल ही बुधवार आणि शनिवारी सकाळी १०:०० वाजता विश्वामित्रीहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी रात्री १२ :३० वाजता रत्नागिरीला पोहोचेल. ही ट्रेन २३ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरपर्यंत धावेल. त्याचप्रमाणे, ट्रेन क्र. ०९१०९ रत्नागिरी – विश्वामित्री स्पेशल ही गाडी रविवार आणि गुरुवारी रत्नागिरीहून पहाटे १:३० वाजता निघेल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५:३० वा. विश्वामित्रीला पोहोचेल. ही ट्रेन २४ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर पर्यंत धावेल. ०९०११, ०९०१९, ०९०१५, ०९११४ आणि ०९११० या ट्रेन क्रमांकांसाठी बुकिंग दि. २३ जुलैपासून सर्व पीआरएस काउंटर आणि आयआरसीटीसी वेबसाइटवर सुरू होईल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### मतकुणकी येथे सलग तिसऱ्या दिवशी शक्तीपीठची मोजणी पाडली बंद; शेतकऱ्यांनी भजनाच्या माध्यमातून राज्य सरकारचा केला निषेध




दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** या शक्तिपीठ हायवेने आम्ही झालोय हैराण, या देवेंद्र फडणवीस ने रचलंय आमचं सरण या भजनाच्या माध्यमातून सरकारचा निषेध करत मत कुणकी येथील मोजणी तिसऱ्या दिवशीही बंद पाडली. दिवसभर टाळ मृदागच्या गजरात शेतकऱ्यांनी भजन, कीर्तन, म्हणत शासनाचा निषेध करत कोणत्याही परिस्थिती त मोजणी होऊ देणार नाही असा निर्धार व्यक्त केला. गेल्या तीन दिवसा पासून मत कुणकी येथे शासकीय कर्मचारी मोजणी साठी येत आहेत. मात्र तिन्ही दिवस शेतकऱ्यांनी मोजणी होऊ दिली नाही. ज्ञानबा तुकाराम चा गजर करत सप्रदायिक भजने तर गायलीच मात्र अमोल पाटील याने तयार केलेली सामाजिक आणि शक्तिपीठ च्या समस्यावर तयार केलेली भजणे सादर करून जोरदार निषेध व्यक्त केला.

### शॉक लागून दोन्ही हात गेले तरी पक्ष्याने मिळवले परीक्षेत यश





दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड शहरापासून जवळच असणाऱ्या सिडको, हडको भागातील गुरुवार बाजार परिसरात राहणाऱ्या वैभवच्या यशाचे जिल्हाभरात कौतुक होत आहे. त्याचे कारण देखील प्रेरणादायी असेच आहे. दहावीत असताना वैभव पतंग उडवत होता. त्यावेळी शॉक लागल्याने त्याचे दोन्ही हाथ निकामी झाले. मात्र, आलेल्या परिस्थितीशी न डगमगता झुंज देत वैभवने पायाने लिहण्याची कला शिकून घेतली आणि आता थेट महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवले आहे. आता मात्र वैभव शिवकुमार पईतवार च्या यशाचे जिल्हाभरात कौतुक होत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अंतर्गत घेतलेल्या परीक्षेत महसूल सहाय्यक या पदासाठी त्याची निवड झाली आहे. आज वैभवच्या या जिद्दीच्या प्रवासाचे संपूर्ण नांदेड मध्ये कौतुक होत आहे. तो केवळ स्वतःसाठीच नाही तर हजारो तरुणांसाठी एक प्रेरणा बनला आहे.

### कटेंगे तो बटेंगेचे ब्रँड ॲम्बेसेडर आहेत ठाकरे बंधू, मंत्री नितेश राणेंचा घणाघाती प्रहार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ''कटेंगे तो बटेंगे'' या फॉर्म्युल्यावरच ठाकरे बंधू चालतायत, असा जबरदस्त घणाघात थेट मंत्री नितेश राणेंकडून करण्यात आलाय. राजकारणाच्या रणांगणात ठाकरे बंधूंचा एकमेकांवरचा विश्वासच राहिलेला नाही, अशी खरमरीत टीका करत राणेंनी 'घरातलंच घरभेदी' चित्र समोर ठेवलंय.

पहिली ते पाचवी हिंदी आणायचा प्रयत्न करून दाखवावा, मी त्यांना सांगतो की, तुम्ही पहिली ते पाचवी हिंदी आणायचा प्रयत्न तर करून बघा, राज्यातील दुकानंच नाही तर शाळाही बंद करू, असं आव्हान राज ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना दिलं. यावर शाळा बंद करण्यापेक्षा मदरसे बंद करून दाखवा. तिथे मराठी शिकवली जात नाही, तिथे अभ्यास शिकवला जात नाही, असं भाजपचे नेते व मंत्री नितेश राणेंनी आज माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रात राहत असाल तर मराठी आलीच पाहिजे, असं मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मीरारोडच्या सभेत ठणकावून सांगितलं होतं. महाराष्ट्रात राहताय शांतपणे रहा, मराठी शिका, आमचं काही तुमच्याशी भांडण नाहीय. पण मस्ती करणार असाल तर महाराष्ट्राचा दणका बसणार म्हणजे बसणार, असा इशारा राज ठाकरेंनी दिला.

# शाहू महाराज यांच्यासोबत विकासाच्या मुद्यावर चर्चा

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी याची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** काँग्रेसचे खासदार शाहू छत्रपती यांची भेट ही राजकीय नव्हती तर, कोल्हापूरच्या विकासाबाबत होती. विकासात्मक मुद्दयांवर या भेटीत चर्चा करण्यात आली. यावेळी त्यांच्यासोबत बाळ पाटणकर आणि नाबार्डचे अध्यक्ष यशवंत थोरात यांचीही भेट झाली आणि. त्यांच्याशीही चर्चा करण्यात आली. अशी माहिती पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, शाहू छत्रपती यांच्यासोबत झालेली भेट राजकीय नव्हती. तर, त्यांचंही अधिवेशन सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी ही भेट होती. कोल्हापूरच्या प्रश्नांना केंद्रीय अधिवेशनात चांगल्या पद्धतीने बळ द्यावे, यासाठी यावेळी चर्चा झाली. त्यांच्यासोबत बाळ पाटणकर आणि नाबार्डचे अध्यक्ष यशवंत थोरात यांच्याशी चर्चा झाली. या सर्वांसोबत जिल्ह्याच्या विकासाच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाल्या. शाहू महाराज हे सर्वांचे मार्गदर्शक आहेत. त्यांच्याकडून आशीर्वाद घेण्यासाठी आलोय.असे ते म्हणाले. तसेच राज ठाकरे यांच्या मराठी भाषा बाबत बोलताना म्हणाले की,मराठी भाषाबाबत यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिलेल आहे. मराठी भाषा आणि इतर भाषांच्या सक्ती बाबत मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी स्पष्टीकरण दिलेल आहे. शंभूराज देसाई यांच्यावर कॅगने केलेले आरोप आणि इतर आरोप हे दोन्ही वेगवेगळे आहेत. आर्थिक कामकाजातील अनियमितता दुरुस्त



करण्यासाठी कॅगचा अहवाल आहे. त्यामुळे सरकारला सुधारण्याची संधी मिळते. हा आरोप फक्त शंभूराजे देसाई यांच्यावर म्हणता येणार नाही.सरकारमध्ये सरकारमध्ये काही दुरुस्त्या असतात. त्यासाठी याचा उपयोग होतो. ज्या काही सुचना द्याव्या लागतील, त्या काही दुरुस्त्या कराव्या लागतील, त्या शंभूराज देसाई करतील. हनी ट्रॅप प्रकरणात आरोप करताना राजकारणीनी देखील भान ठेवणे गरजेचे आहे.गरज नसताना अनेक जण त्या प्रकरणात बोलत आहेत.संशयाच्या भोवऱ्यात अनेक जण आहेत. त्यामुळे गरज नसताना प्रतिमा मलीन करण्याचे काम कोणीही करू नये. आक्षेप न घेता एखादा विषय तडीस न्यायला हवा, विरोधक म्हणून असे केले, तर राज्याला देखील न्याय मिळेल. अशा प्रकारचे आरोप करणे म्हणजे हे बालिशपणाचे लक्षण आणि आपल्या सोबतच्या लोकप्रतिनिधींची दिशाभूल करणे ठरेल. शक्तिपीठ महामार्ग प्रश्न शेतकऱ्यांना विश्वासात घ्या असं आम्ही यापूर्वी देखील सांगितलेले आहे. शेतकऱ्यांशी संवाद साधल्याशिवाय कोणतीही गडबड करू नये असे सांगितले आहे. महायुतीमध्ये एकनाथ शिंदे यांचा वाटा मोठा आहे. तर, विरोधक आहेत. आरोप करतात.मात्र, महाराष्ट्रासाठी या सरकारने अनेक चांगल्या गोष्टी केल्या. एकनाथ शिंदे यांच्या कामाकडे दुर्लक्ष करणे हे विरोधकांचे काम आहे.असे मतही यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.


## एकटीला पाहून नियत बदलली, ओढत झुडुपात नेऊन नराधमाचा विवाहितेवर अत्याचार, महाराष्ट्राला हादरवणारी घटना!

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्याच्या लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका नराधमाने रस्त्याने पायी चाललेल्या एका विवाहित महिलेवर लैंगिक अत्याचार केला आहे. आरोपीनं पीडित महिलेला एका निर्मनुष्य ठिकाणी गाठून तिच्यावर जबरदस्ती केली. तसेच बाजुला असलेल्या झुडूपात घेऊन जात तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आहे. या प्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अवघ्या २४ तासांत पोलिसांनी घटनेची उकल केली आहे. पोलिसांनी एका जॅकेटवरून तपास करत नराधमाला बेड्या ठोकल्या आहेत.

बाळू दत्तू शिर्के असं अटक केलेल्या ३५ वर्षीय नराधम आरोपीचं नाव आहे. तो मावळ तालुक्यातील जीवन येथील रहिवासी आहे. १५ जुलै रोजी त्याने एका विवाहित महिलेवर लैंगिक अत्याचार केला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल होताच पोलिसांनी अवघ्या २४ तासांत नराधमाला बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ठाकूरसाई गावात घडली आहे. घटनेच्या दिवशी मंगळवारी (१५ जुलै) दुपारी ३३ वर्षीय विवाहित महिला माहेरी जाण्यासाठी पायी निघाली होती. ती रस्त्याने एकटी चालत जात होती. यावेळी आरोपी बाळू शिर्के याची तिच्यावर नजर पडली. एकटीला पाहून नराधमाची नियत बदलली, त्याने दुचाकीवरून तिचा पाठलाग सुरू केला. पीडित महिला रस्त्यावर एका निर्मनुष्य ठिकाणी पोहचली असता, तिथे कोणीही नसल्याचे पाहून आरोपीनं महिलेला जबरदस्तीने ओढून एका निर्जन ठिकाणी नेले. याठिकाणी त्याने तिच्यावर अत्याचार केला. अत्याचार केल्यानंतर पीडितेला त्याच अवस्थेत सोडून आरोपीने तिथून पळ काढला. या घटनेनंतर पोलिसांनी कोणताही ठोस पुरावा नसताना शिताफीने तपासाला सुरुवात केली. घटनास्थळापासून बऱ्याच लांब असलेल्या एका सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी पीडितेचा पाठलाग करताना दिसून आला. विशेष म्हणजे आरोपीने घातलेल्या जॅकेटमुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी मावळ तालुक्यातील विविध गावांमध्ये शोधमोहीम राबवली आणि अखेर आरोपी बाळू शिर्के याला अटक केली. घटनेच्या दिवशी पीडित महिलेचा आपल्या पतीसोबत वाद झाला होता. पतीशी वाद झाल्यानंतर रागाच्या भरात ती घराबाहेर पडली होती. ती माहेरी जात असतानाच नराधम शिर्के याने तिच्यावर डाव साधला आणि लैंगिक अत्याचार केला. एका विवाहित महिलेवर दिवसाढवळ्या अत्याचार झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## कोल्हापुरच्या राजाचं परळमधून प्रस्थान





दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना महाराष्ट्रातील पहिलं बाप्पाचं आगमन आज मुंबईतून थाटात झालं आहे. कोल्हापूरचा राजा ही १२ फूट उंच मूर्ती आज परेल वर्कशॉपमधून कोल्हापूरच्या दिशेने रवाना झाली आहे. विशेष म्हणजे या मूर्तीची निर्मिती प्रसिद्ध कांबळी आर्ट्सतर्फे करण्यात आली असून, ही मूर्ती लालबागच्या राजाची प्रतिकृती आहे. मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिसच्या सहाय्याने तयार करण्यात आली असून, तिचा प्रवास तब्बल २६ ते २७ तासांचा असणार आहे. बाप्पाला घेण्यासाठी कोल्हापूरहून आलेले कार्यकर्ते पारंपरिक कोल्हापुरी टोप्या घालून गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया अशा जय घोषात आपल्या बाप्पाला घेऊन जात आहे. २०१३ पासून कोल्हापूरच्या 'गोल सर्कल' गणेश मंडळाकडून कांबळी आर्ट्स येथे ही मूर्ती तयार केली जाते. राज्यभरात गणेशोत्सवाचा उत्साह वाढताना दिसत आहे आणि त्याच दरम्यान आज महाराष्ट्रातील पहिलं बाप्पाचं आगमन उत्साहात पार पडलं असल्याने या 'कोल्हापूरचा राजा' ला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने भक्तांनी मुंबईकरांनी गर्दी केली आहे.

## नांदेड मध्ये भारतातील पहिले किन्नर भवन उभारणार; खा. अजित गोपछडे यांनी केली जागेची पाहणी

दैनिक आपला विदर्भ





**नांदेड/प्रतिनिधी** समाजातील एक वंचित घटक म्हणून ज्या किन्नरकडे पाहिले जाते त्यांचा सामाजिक दर्जा वाढवा. त्यांना प्रतिष्ठा मिळावी या अनुषंगाने खा. डॉ. गोपछडे यांनी यशस्वी प्रयत्न केले असून नांदेड शहरालगत साडेतीन एकर जमिनीवर लवकरच किन्नर भवन उभारण्यात येणार आहे. या अनुषंगाने जागेची पाहणी आज खा. डॉ. अजित गोपछडे यांनी समाज कल्याण अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांसह केली. समाजातील तिसरा घटक म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते त्या किन्नर, तृतीय पंथीयांचे सामाजिक जीवन अत्यंत हालाखीचे आणि धक्काधूकीचे असे झाले आहे. त्यामुळे त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी, त्यांच्या आयुष्यातही सुख यावे या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राज्य आणि केंद्र सरकारच्या वतीने तृतीय पंथीयांसाठी अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविल्या जात आहेत. शिवाय त्यांना चांगले जीवन जगता यावे, त्यांच्या जगण्या मरणाच्या प्रश्नांना न्याय देता यावा यासाठी नांदेड मध्ये कामठा परिसरातील म्हळजा येथे तब्बल साडेतीन एकर जमिनीवर किन्नर भवन उभारण्यात येणार आहे. येथे किन्नर साठी स्मशानभूमी, निवास व्यवस्था व अन्य गोष्टींची ही तरतूद करण्यात येणार आहे. या जागेची पाहणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आज केली आहे. याप्रसंगी समाजकल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे, तहसीलदार संजय वारकड, कमल फौंडेशनचे सचिव अमरदीप गोधणे यांच्यासह रणजीता बकस गुरू, फरिदा बकस, अर्चना बकस, जया बकस, बिजली बकस आदी उपस्थित होते.

## चांदवड आठवडे बाजारातून महिलेने लांबिवली सोन्याची पोत, तर चार दिवसात चोरीचा लागला छेडा

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** चांदवड ते मनमाड रोड लगत हप्त्याला भरत असलेला आठवडे बाजारातून दिनांक १४/७/२०२५ रोजी संगीता भालचंद्र बिल्लाडे क्षत्रिय राहणार श्रीराम रोड चांदवड, ही महिला सायंकाळी आठवड्याचा बाजार करता जात असताना, गर्दीचा फायदा घेऊन दोन अनोळखी महिलांनी ८१ हजार रुपये किमतीचे १५ ग्रॅम वजनाची पोत चोरी केली.

या संदर्भात संगीता भालचंद्र क्षत्रिय यांनी चांदवड पोलीस ठाण्यास फिर्याद दाखल केली,त्यावरून चांदवड पोलिसांनी गुन्हा दाखल



केला असून या संदर्भात नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधु, व उपविभागीय पोलीस अधिकारी मनमाड बाजीराव महाजन यांनी या गुन्ह्याचा आढावा घेऊन गुंन्हा उघडीस आणण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

चांदवड शहरातील नागरिकांना केलेली विचारपूस तसेच तपासणी केली सीसीटीव्ही फुटेज त्यांचे तांत्रिक विश्लेषण या प्रकारे झालेले तपासातून आणि गुप्त बातमीच्या आधारे सदर गुन्हा केलेल्या अज्ञात महिला या चांदवड शहरातील गणुर चौफुली परिसरात फिरत असून चांदवड शहरात पेट्रोलिंग करीत असताना दोन महिला या संशोधरीत्या फिरताना दिसल्या. त्यांना त्यांची नावे विचारपूस करताना त्यांनी उडवाउडवीची उत्तर दिल्याने त्यांना पोलीस ठाण्यात घेऊन आले असताना त्यांची नावे विचारणा केली असता. १// संगीता अतिश सकटे वय ३५ वर्ष राहणार दुर्गा वाली गल्ली राजेंद्र नगर जिल्हा इंदूर राज्य मध्य प्रदेश,२// संध्या विरु सकटे वय ३० वर्षे राहणार भीम नगर दुर्गा वाली गल्ली राजेंद्र नगर जिल्हा इंदूर राज्य मध्ये प्रदेश असे सांगितले.

यावरून या घटनेची सविस्तर माहिती उपविभागी पोलीस अधिकारी मनमाड बाजीराव महाजन यांनी दिली यामध्ये चांदवड पोलीस निरीक्षक कैलास वाघ, पोलीस हवालदार स्वप्निल जाधव, पोलीस शिपाई विक्रम बसते, पोलीस शिपाई प्रदीप आजगे, पोलीस शिपाई भुषण साळवे , पोलीस शिपाई पाचपुते, पोलीस शिपाई गोविंद राऊत, तसेच गुन्हे शाखा नाशिक ग्रामीण पोलीस हवालदार जगताप पोलीस हवालदार गांगुर्डे महिला पोलीस हवालदार शिरसाठ पोलीस शिपाई सानप यांनी काम बघितले.

# स्थानिक स्वराज्य संस्थेवर भगवा फडकविण्यासाठी शिवसेना सदस्य नोंदणी मोठ्या प्रमाणत करा

## शिवसेना नेते तथा केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले शिवसेनिकांना आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्यावर भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी संघटनात्मक शक्ती वाढवावी. शिवसेना सदस्य नोंदणी ही मोठ्या संख्येत करा असे आवाहन शिवसेनेचे नेते तथा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज शेगाव येथे केले.

बुलढाणा जिल्ह्यातील शेंगाव, खामगांव, जळगाव जामोद, मलकापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि सर्व अंगीकृत संघटनांच्या आजी-माजी पदाधिकारी यांची बैठक आज १७ जुलै रोजी शेगाव येथील वर्धमान भवन येथे संपन्न झाली त्यावेळी शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना शिवसेना नेते तथा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते यावेळी शिवसेनेचे जिल्हा संघटक तथा आमदार संजय गायकवाड,शिवसेना जिल्हाप्रमुख शांताराम दाणे,ओमसिंग राजपूत,युवासेना सहसचिव तथा जिल्हाप्रमुख ऋषी जाधव,महिला







आघाडी जिल्हाप्रमुख सौ.शारदाताई पाटील व्यासपीठावर उपस्थित होत्या शिवसेना नेते प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे वर्चस्व निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून सर्व शिवसैनिकांनी कामाला लागा जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करा, सरकारच्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवा,शासकीय योजनेचा लाभ गरजू लाभार्थ्यांना देण्याचं काम ही शिवसैनिकांनी करावं अस आवाहन त्यांनी केले ''शिवसेना ही जनतेच्या हक्कासाठी लढणारी संघटना आहे. या संघटनेची ओळख कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वावर आणि निष्ठेवर अवलंबून असल्याचेही शिवसेना नेते प्रतापराव जाधव यावेळी म्हणाले.

जिल्हा संघटक तथा आमदार संजय गायकवाड यांनी गाव तिथे शिवसेनेची शाखा आणि घर तेथे शिवसैनिक असं जाळ संपूर्ण जिल्हाभर निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून संघटनात्मक बांधणी करण्याबाबत शिवसैनिकांना मार्गदर्शन केले यावेळी खामगांव,जळगाव जामोद, मलकापूर या विधानसभा मतदारसंघांचा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आढावा घेण्यात आला बैठकीत पक्षसंघटना,पक्षशिस्त,पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधील समन्वय यावर भर देत आला या बैठकीत अनेकांनी मुक्तपणे आपले विचार मांडले आणि संघटनात्मक बळकटीसाठी आवश्यक अशा सूचना केल्यात या बैठकीला शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजू पाटील मिरगे शेगाव शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय आवताडे खामगाव शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष भाऊ डीवरे नांदुरा शिवसेना उपजिल्हाप्रमुख अशोक टावरी शिवसेना उपजिल्हाप्रमुख देविदास घोपे शिवसेना शिवसेना नेते चेतन पाटील घिवेवे तालुकाप्रमुख रामा पाटील थारकर शेगाव शिवसेना तालुकाप्रमुख मलकापूर विजयजी साठे शिवसेना तालुकाप्रमुख नांदुरा सुनील जुनारे शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे खामगाव शिवसेना तालुकाप्रमुख केशव ढोकणे संग्रामपूर शिवसेना तालुकाप्रमुख जळगाव जामोद अजय पारसकर पवन बारिंगे उपजिल्हाप्रमुख किसान आघाडी महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख मयुरी पाटील शेगाव जयश्री देशमुख खामगाव यांच्या सह शिवसेना- युवासेना महिला आघाडीचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन रणनिती पुढील रणनिती : माजी आमदार विजयराज शिंदे यांची पत्रकार परिषदेत माहिती



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणूक कार्यकर्त्यांसाठी स्वबळावर तर स्वबळावर नाही. तर, युतीत लढणार असल्याचे माजी आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, बुलढाणा हा भाजपाचा गड राहिला आहे. तेच वैभव पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते आग्रही असल्याने बुलढाणा नगर पालिकेसह जिल्ह्यात ज्या ठिकाणी कार्यकर्ते आग्रही असतील त्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याचे भाजपाचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. त्यामुळे आता शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादीचे पदाधिकारी काय भूमिका घेतात? हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या भूमिकेमुळे मात्र जिल्ह्यातील राजकीय वातावरणात खळबळ उडाली आहे.

### बुलढाण्यात रक्ताचा तुटवडा, शासकीय रक्तपेढीत दोन दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा; रक्तदात्यांनी पुढे येऊन रक्तदान करण्याचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** गेल्या आठवड्यापासून बुलढाणा शहरासह जिल्ह्यात रक्ताचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याच चित्र आहे, बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात असलेल्या रक्तपेढीमध्ये केवळ दोन दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा उपलब्ध आहे. सध्या शेती मशागतीची लगबग सुरू आहे, शिवाय महाविद्यालयीन विद्यार्थी देखील व्यस्त आहेत, त्यामुळे अचानक रक्तदानाची आणि शिबिरांची संख्या कमी झाली आहे, परिणामी रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने चिंतेचे वातावरण आहे. रक्तदात्यांनी पुढे येऊन रक्तदान करावे, सामाजिक संघटना आणि संस्थेने देखील पुढाकार घेऊन रक्तदान शिबिर आयोजित करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

### अकोला पोलिसांचा गुन्हेगारांना धडा




दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी अकोला पोलिसांनी सराईत गुन्हेगारांची धिंड काढायला सुरुवात केली आहे. गेल्या २ दिवसात अकोला पोलिसांनी दोन ठिकाणी टोळीने गुन्हेगारी करणाऱ्या गुन्हेगारांचा रोड शो केला आहे. आज अकोल्यातल्या जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत टोळीने गुन्हेगारी करणाऱ्या ३ आरोपींची धिंड काढण्यात आली आहे. अकोल्यातल्या कृषी नगरात दोन दिवसांपूर्वी दोन गटात वाद झाला होता. याठिकाणी काल रात्री ७ आरोपींची धिंड काढली होती. तर कृषी नगरात वर्चस्वाच्या लढाईतून हा वाद झाला होता. तर तलवारीसह बंदुकीचा या वादात वापर झाला होता. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली होती. आता या दोन्ही गटातील प्रमुखांना आणि त्यांच्या साथीदारांची काल रात्री कृषी नगर परिसरात धिंड काढण्यात आली. अकोला शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणाऱ्या या गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी हा रोड शो आहे. त्यामुळे या गुन्हेगारांना अकोला पोलिसांनी चांगला धडा शिकवला आहे.

# सिलिंग व बॉटम पट्टया तयार करणाऱ्या बनावट कारखान्यावर पोलिसांचा छापा

## ३ लाख ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** सेंट गोबीन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या अधिकृत कंपनीच्या डिझाइन आणि पॅटर्नचा अनधिकृत पणे वापर करून बनावट सिलिंग व बॉटम पट्टया तयार करणाऱ्या उत्पादक कारखान्यावर धुळ्यातील चाळीसगाव रोड पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ३ लाख ७७ हजार रुपये किंमतीचा बनावट मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी चाळीसगावरोड पोलीस ठाण्यात कारखान्याच्या मालकाविरुध्द कॉपीराईट ॲक्टसह फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यातील कसबा पेठ येथील पवळे चौकातील रहिवासी सर्फराज अब्दुल रऊफ तांबोळी यांनी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीनुसार, धुळे येथील स्मार्ट स्टील शंभरफुटी रोड येथे त्यांची ऑथोराईज कंपनी सेंट गोबीन इंडिया प्रा.लि. मुंबई या कंपनीने विकसित केलेल्या डिझाइन, पॅटर्नच्या सिलींग व बॉटम पट्टया प्रमाणे दिसणाऱ्या बनावट मालाची निर्मीती करुन स्वतःच्या फायदयासाठी विक्री करण्याच्या उद्देशाने त्याचा साठा मुंबई- आग्रा महामार्गावरील गोल्डन पार्कजवळील एका गोडावूनमध्ये केला आहे. या तक्रारी वरुण चाळीसगावरोड पोलिसांनी कारखान्यासह गोडावून वर छापा टाकून कारवाई केली.

याठीकाणी मुख्तार शहजाद खान, रा. गरीब नवाज नगर, धुळे, हे त्यांच्या कारखान्यासह गोडावून मध्ये पट्टया उत्पादन करणारे दोन मशीन, सिलिंग पट्टया बनवण्यासाठी वापरण्यात येणारे लोखंडी डाय असा ३ लाख ७७ हजार ३४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन सील करण्यात आला आहे. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात मुख्तार खान विरोधात कॉपीराईट ॲक्टचा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलिसांनी यावेळी दिली.

### तोंडाला पांढरे रुमाल बांधून शासकीय नर्सिंग कॉलेजच्या शिक्षकांनी वेधले सरकारचे लक्ष




आपल्या विविध मागण्यांसाठी शासकीय नर्सिंग कॉलेजच्या शिक्षकांनी गेल्या दोन दिवसापासून काम बंद आंदोलन सुरू केल आहे, आज या कर्मचाऱ्यांनी आपल्या तोंडाला पांढरे रुमाल बांधून सरकारचे लक्ष वेधले आहे. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परीक्षा तोंडावर आली आहे, तर दुसरीकडे शिक्षकांच्या आंदोलनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### अंजनी बु येथील देहव्यापारावर पोलिसांचा छापा; दोन महिला व दोन पुरूषांवर कारवाई : रोख रक्कम जप्त

**डोणगाव/प्रतिनिधी :** पोलीस स्टेशनतंर्गत अंजनी बु. येथे सुरू असलेल्या देहव्यापारावर पोलीसांनी छापा मारून चार महिलांना रोख रक्कम व काही साहित्यासह अटक केली. सदर कारवाई डोणगाव पोलिसांच्या वतीने करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अंजनी बु येथे देहव्यापार सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

सदर माहितीवरून १७ जुलै ला रात्री ९.१५ वाजताच्या दरम्यान मेहकरचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील तसेच लोणारचे ठाणेदार निमिष मेहेत्रे, मेहकरचे ठाणेदार आलेवार तसेच डोणगाव चे ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी पोलीस पथकासह अंजनी बु येथे १७ जुलै रोजी रात्रीदरम्यान छापा मारला. यावेळी एक २९ वऱ्षीय तरूणी व ३१ वऱ्षीय महिला तसेच ,५५ वऱ्षीय वामन लाड, विजय दत्ता बोरकर वय २५ रा.डोणगांव ता. मेहकर जि. बुलडाणा हे घरामध्ये देहव्यापार करताना पंच समक्ष मिळून आले.यावेळी पोलिसांनी त्यांची अंग झडती घेतली असता, नगदी पैसे, वापरत असलेले मोबाइल, युपीआय सॅनर, कंडोम पाकीट असे ९ हजार ६०० रुपये किंमतीचे साहित्य आणि ११ हजार रुपये किंमतीचा मोबाइल असा ऐकूण २१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर घटनेबाबत लोणारचे ठाणेदार निमेष मेहेत्रे यांच्या तक्रारीवरून आरोपी विरूद्ध कलम ३,४,५,६,७ अनौतीक व्यवहार प्रतिबंधक अधिनियम १९५६ अन्वये १८ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर घटनेचा पुढील तपास ठाणेदार अमरनाथ नागरे करीत आहेत.

# हळदीला ड्रायर उपलब्ध करुन देण्याची आमदार भावना गवळी यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** मागील काही वर्षापासून हळदीला चांगला भाव मिळत असल्यामुळे तालुक्यातील शेतकरी हळदी या पिकाकडे वळला आहे. बागायती जमीन असणाऱ्या कास्तकारांनी हळद या हमखास उत्पादन देणाऱ्या पिकाला प्राधान्य दिले आहे त्यामधून त्यांना चांगले उत्पादन सुद्धा होत असून बाजार भाव ही बऱ्यापैकी मिळत असल्याने त्यांना आर्थिक सुबत्तता खुणावत आहे. मराठवाडा आणि विदर्भ यातील हिंगोली आणि वाशिम जिल्ह्यामध्ये हळदीचे उत्पादन जास्त घेतले जाते त्यामुळे शासनाने हिंगोली जिल्ह्यांमध्ये हळद संशोधन केंद्राला मंजुरी दिलेली आहे या अनुषंगाने शासनाने हळद संशोधन केंद्राला निधी देऊन कामाला गती द्यावी आणि शेतकऱ्यांना



आमदार भावनाताई गवळी यांनी विधानसभेत जी मागणी केलेली आहे त्याचा शासनाने विचार करावा त्या माध्यमातून हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या हळद तयार करतानाच्या यातना आणि अनावश्यक खर्च निश्चित कमी होईल. भावनाताई स्वतः एक कृषी कन्या असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव आहे त्यांनी केलेल्या या मागणीबद्दल आम्ही त्यांचे आभार व्यक्त करतो.

**-शंकर चोपडे, हळद उत्पादक शेतकरी**
**भर जहागीर ता. रिसोड**

हळद काढणीच्या वेळेत ज्या काही अवकाळी पावसाच्या त्रासामुळे यातना सहन कराव्या लागतात त्याला पर्याय म्हणून ड्रायर ची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी विधान परिषदेच्या आमदार भावनाताई गवळी यांनी विधान परिषदेमध्ये करून हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा वाचा फोडली आहे. हळद काढणीच्या हंगामात अनेक वेळा अवकाळी पाऊस होतो वर्षभर कष्ट करून उत्पादन केलेले पिक हातचे जाते की काय अशी परिस्थिती निर्माण होते अवकाळी पावसाच्या सरीमुळे हळदीच्या वाळत असलेल्या पिकाला डाग पडतात, त्याची साठवून ठेवण्याची कालमर्यादा कमी होते,त्याला कीड लागण्याची भीती तयार होते.पाऊस येण्याच्या भीतीने अनावश्यक खर्च करावा लागतो,प्लास्टिक खरेदी करावे लागते या सर्व त्रासातून सुटका होण्याकरता नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना पोखरा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ड्रायरची सुविधा उपलब्ध व्हावी आणि त्या माध्यमातून शेतकऱ्याची हळद त्वरित सुकविण्यासाठी त्याला मदत हवी अशी मागणी आमदार गवळी यांनी विधान परिषदेत लावून धरली.यामुळे हळद उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. पोखरा योजनेच्या अनेक उपक्रमातून शेतकऱ्यांचा फायदा झालेला आहे. आमदार भावना गवळी यांनी वाशिम जिल्ह्यातील पोखरा योजनेमध्ये गावांची व्याप्ती वाढवण्यासाठी पाठपुरावा केला होता. आणि ड्रायर उपलब्ध करून देण्याची त्यांची मागणी जुनीच आहे आज त्यांनी ही मागणी प्रत्यक्ष विधान परिषदेत केल्यामुळे या मागणीची पूर्तता होऊन शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल अशी चर्चा होत आहे.